3) नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर आपण नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करुन घेवून जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. आपण नियुक्ती स्विकारताच जात प्रमाणपत्र वैधता तपासणी करण्यासाठी संबंधीत जात पडताळणी समितीकडे प्रस्ताव सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोहोच पावतीची साक्षांकीत प्रत या कार्यालयास सादर करावी. जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यांत आलेली असल्याने जात पडताळणी समितीने जात प्रमाणपत्र अवैध ठरविल्यास महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम 2000 मधील तरतुदीनुसार कारवाई करण्यांत येईल.

4) याचिका क्र.2136/2011 व अन्य याचिकांवर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने दि.25.08.2011 रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यांत आलेली आहे. यावर मा.सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधीन राहून सदर नियुक्ती आदेश राहील.

5) पोलीस शिपाई पदावर तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात नियुक्ती दिल्यानंतर भविष्यात चारित्र्य पडताळणी अहवालासंदर्भात प्रतिकूल फेरअहवाल प्राप्त झाल्यास संबंधीत उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल. तसेच पोलीस पडताळणीत किंवा त्यानंतर केव्हाही आपली शैक्षणिक प्रमाणपत्रे, जातीचे प्रमाणपत्रे व इतर प्रमाणपत्रे तसेच कोणतेही वस्तुस्थिती निदर्शक माहिती दडवून ठेवल्याचे अथवा खोटी माहिती दिल्याचे आढळून आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल. आपण समांतर आरक्षण लाभ घेण्यासाठी सादर केलेले समांतर आरक्षणाबाबतचे प्रमाणपत्र भविष्यात खोटे असल्याचे आढळून आल्यास आपली सेवा कोणतेही कारण न देता तात्काळ समाप्त करण्यांत येईल.

6) पोलीस दलात सेवेच्या अनुषंगाने योग्यता व पात्रता तपासण्यासाठी उमेदवारांची पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये मानसिक चाचणी (Psychological Test) घेण्यांत येईल. सदर चाचणीत उमेदवार अपात्र ठरल्यास त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल.

7) प्रशिक्षण कालावधीत आपणांस कोणत्याही प्रकारची इजा अगर दुखापत झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही अथवा कोणतीही नुकसान भरपाईस पात्र राहणार नाहीत.

8) प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणत्याही प्रकारची रजा मिळणार नाही. मुलभूत प्रशिक्षणानंतर पोलीस दलात उमेदवाराची पोलीस मुख्यालय व आवश्यकतेप्रमाणे इतरत्र विभागामध्ये/पोलीस स्टेशनमध्ये नेमणूक केली जाईल व सदरची नेमणूक त्यांच्यावर बंधनकारक राहील.

9) प्रशिक्षण कालावधीत/अस्थायी सेवेत नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपायांत दोष आढळल्यास किंवा कोणतेही बेशिस्त, गैरवर्तन किंवा नितीमुल्यांचा -हास करणारे अशोभनिय कृत्य केल्यास, पोलीस सेवेत स्वारस्य न दाखवल्यास किंवा प्रशिक्षण कालावधीत वरिष्ठ अधिका-यांच्या पुर्व परवानगीशिवाय गैरहजर राहिल्यास, त्यांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना/नोटीस न देता, त्यांची सेवा समाप्त (Terminate) करण्यांत येईल.

IQAC COORDINATOR
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya

INCHARGE PRINCIPAL
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nashik Road 422 101

परीक्षा 04 संधींमध्ये उत्तीर्ण व्हावी लागेल. जर 04 संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाली नाही तर त्यांची सेवा समाप्त करण्यांत येईल. या कालावधीमध्ये त्यांना वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही. वार्षिक वेतनवाढ रोखलेले उमेदवार संबंधित परीक्षा विहित संधीत उत्तीर्ण झाल्यास रोखून ठेवलेली वेतनवाढ त्यास देय होईल, परंतु वेतनवाढ रोखून धरल्यामुळे देय होणारी थकबाकी मिळण्याचा त्यांना हक्क असणार नाही.

20) ठाणे शहर पोलीस घटकात पोलीस शिपाई पदावर नियुक्ती झाल्यानंतर अन्य पोलीस घटकांत आंतरजिल्हा बदलीसंदर्भात महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-1017/3843/प्र.क्र.469/पोल-5ब, दि.26.10.2017 अन्वये कार्यवाही करण्यात येईल.

21) शासन पत्र, गृहविभाग, क्रमांक आरसीटी-0312/प्र.क्र.228/पुनर्बांधणी-166/पोल-5अ, दि.11/08/2016 अन्वये तसेच अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र.प्रशिक्षण/पो.शि.भरती/सेवाप्रवेश नियम-सुधारणा/36/2016/4391, दि.07/10/2016 अन्वये महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, 2011 मधील नियम 3(1)(ड) मध्ये केलेल्या सुधारित तरतुदींनुसार पोलीस भरतीमध्ये पोलीस शिपाई पदाकरीता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने मोटार वाहन अधिनियम, 1988 मधील कलम 2(21) नुसार हलकी वाहने चालविण्याचा (LMV) परवाना धारण केला असणे आवश्यक आहे. परंतु सदर परवाना धारण न करणाऱ्या उमेदवाराने नियुक्तीनंतर त्यांचे पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वर्षाच्या आत परवाना धारण न केल्यास निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यात येईल. जर एखादया उमेदवाराने चालक पोलीस शिपाई पदाचे कर्तव्य नाकारले तर त्यांचा कुठल्याही पदासाठी नियुक्तीचा हक्क राहणार नाही. तसेच नियुक्ती दिलेल्या सर्वच उमेदवारांना चालक प्रशिक्षण देण्यात येऊन त्यांना चालकाचे कर्तव्यसुध्दा करावे लागेल.

22) महाराष्ट्र पोलीस शिपाई, (सेवाप्रवेश) नियम 2011 मधील नियम 10 अन्वये पोलीस शिपाई पदावर नेमणूक दिलेल्या उमेदवाराला मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर मराठी व हिंदी भाषा परीक्षा त्याबाबतच्या नियमानुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

23) या आदेशान्वये नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना मुंबई पोलीस अधिनियम 1951, महाराष्ट्र पोलीस नियमावली 1999, मुंबई पोलीस (शिस्त व अपिल) नियम 1956, महाराष्ट्र नागरी सेवा व राज्य शासनाने वेळोवेळी विहित केलेले अन्य नियम लागू होतील. सदर नियमातील तरतुदीनुसार उमेदवारास कोणतीही पुर्व सुचना न देता सेवामुक्त करण्याचे अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहतील.

24) उमेदवार कर्तव्यावर रुजु होतेवेळी भारतीय राज्य घटनेतील संघराज्याशी एकनिष्ठ राहणेबाबत लेखी शपथ घ्यावी लागेल.

25) नवप्रविष्ठ पोलीस शिपाई पदावर नियुक्ती दिल्यानंतर आपणांस पुढील उच्च शिक्षण अथवा इतर विभागात नियुक्तीसाठी परीक्षा दयावयाची असल्यास त्या परीक्षेस बसणेसाठी अर्ज करणेपुर्वी त्यांनी या कार्यालयाची पुर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

IQAC COORDINATOR
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh Mahila Mahavidyalaya
Arts, Com. & Sci. ... Road, Nashik Road-422 101

26) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र.पोमसं/6/10/भरती/सेवाजेष्ठता/22/2013 दि.17.08.2013 अन्वये स्थायी आदेश क्र.22/2013 मधील तरतुदीनुसार सेवाजेष्ठता निश्चित करण्यात येईल.

27) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रशिक्षण-2000/प्र.क्र.61/2001/39 दि.19.03.2003 नुसार गट-क पदावर नव्याने नियुक्त होणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांनी संगणक अर्हता त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील, अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त होतील. शासन निर्णय माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) विभाग क्र. मातंसं 2012/प्र.क्र.277/39, दि.04.02.2013 मध्ये नमूद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक अभ्यासक्रमांपैकी कोणतेही एक प्रमाणपत्रधारक असावा. तसेच सामान्य प्रशासन विभागाकडील दि.28.05.2018 च्या

INCHARGE PRINCIPAL
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya

अधिसूचनेतील महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) (सुधारणा) नियम, 2018 नुसार शासनाने विहित केलेल्या कालावधीत संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर न केल्यास अशा उमेदवाराची वेतनवाढ, प्रमाणपत्र सादर करेपर्यंत किंवा प्रमाणपत्र सादर करण्यास सूट मिळेपर्यंत रोखून धरली जाईल. संगणक अर्हता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर अशा सूट मिळाल्यानंतर, वेतनवाढ रोखून धरल्यापासून देय होणारी थकबाकी मिळण्याचा त्यांना हक्क असणार नाही.

28) नियुक्ती आदेशातील जे उमेदवार सध्या शासकीय/निमशासकीय सेवेत कार्यरत आहेत अशा उमेदवारांनी त्यांच्या पूर्वीच्या सेवेचा राजीनामा मंजुरीबाबतचे आदेश किंवा कार्यमुक्तीचे आदेश या कार्यालयास सादर केल्यानंतरच त्यांना या आस्थापनेवर हजर करुन घेण्यात येईल.

29) महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि.शा.नि.क्र.एसआरव्ही-2018/सी आर पी.67/प्र.क्र.207/कार्या.12, दि.28.05.2018 व महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली, 1982 मधील तरतुदीनुसार नियुक्ती आदेश निर्गमित झाल्या दिनांकापासून 30 दिवसांचे आत संबंधीत उमेदवारांनी नियुक्ती ठिकाणी हजर होणे आवश्यक आहे. सदर कालावधीत नियुक्ती झालेला उमेदवार हजर न झाल्यास, असा उमेदवार नोकरीची संधी गमावेल व त्याचे नियुक्ती आदेश रद्द करण्यात येतील. याबाबत उमेदवाराकडून देण्यात येणाऱ्या कारणाचा/विनंतीचा विचार केला जाणार नाही याची नियुक्ती आदेशातील उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(दत्तात्रय कांबळे)
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय-1
**पोलीस आयुक्त ठाणे शहर करीता**

प्रति,

**वरील सर्व संबंधित उमेदवार यांना.**

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-**

1) **राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, ठाणे शहर.**

2/- उपरोक्त नमूद 01 ते 43 करीता उमेदवार यांना पोलीस शिपाई पदावर पोलीस मुख्यालय येथे हजर करुन घेवून त्यांची नोंद हजेरी पटावर घेवून उमेदवार हजर झाल्याची तारीख या कार्यालयास सादर करावी. नवप्रविष्ट पोलीस शिपाई यांना आवश्यक ते सर्व किट सरंजाम किट पेटीसह अदा करुन त्यांना पोलीस प्रशिक्षण केंद्रामध्ये पुढील मुलभूत प्रशिक्षणासाठी रवाना करेपर्यंत त्यांना पोलीस मुख्यालयात प्राथमिक प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच त्यांना एच.डी.एफ.सी. अथवा इतर राष्ट्रीयकृत बँकेत तात्काळ खाते उघडून खाते नंबर लेखा शाखेत सादर करण्याची समज द्यावी.

2) **कार्यालय अधीक्षक, लेखा शाखा, ठाणे शहर.**

2/- शासन निर्णय क्र.अनिवो/1005/126/सेवा-4, दि.31.10.2005 अन्वये दि.01.11.2005 नंतर शासकीय सेवेत नियुक्ती झाल्याने नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांचे नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन/राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजने अंतर्गत विहित नमुन्यातील फॉर्म त्वरीत भरुन घ्यावेत. तसेच त्यांचे बँक खाते क्रमांक प्राप्त करुन घेवून प्रचलित नियमांप्रमाणे वेतन व भत्यांची आकारणी करावी. सदर नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना मुलभूत प्रशिक्षणासाठी पाठविण्यात येणार असल्याने सदरची कार्यवाही तातडीने पूर्ण करावी.

प्रत :- 1) सहा.पोलीस आयुक्त, मुख्यालय, ठाणे शहर
2) आस्था-2/2
3) 9 ए.एस.पोलीस पत्रक प्रसिध्दीसाठी.

**IQAC COORDINATOR**
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nashik Road-422 101

**INCHARGE PRINCIPAL**
NSPM's [illegible] Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nashik Road-422 101

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग

दूरध्वनी क्र. ०२२ २२६२०१११
विस्तारीत क्र. ३०४
ई-मेल - [illegible]

कक्ष-१ (कनिष्ठ आस्थापना/भरती कामकाज),
नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला,
पोलीस आयुक्त कार्यालय, डी.एन.रोड, मुंबई ४०० ००१

का.आ.क्र.पोआ/कक्ष-१(पोभ)/२१/2767/२०२४. दि.20/12/२०२४.

# नियुक्ती आदेश

प्रति,
प्रतिक्षा अजय जाधव,
आवेदन क्र. २२०२१०१२०००००३९९५,
बैठक क्र. १२३८८.

विषय :- मुंबई पोलीस शिपाई भरती- २०२१
पोलीस शिपाई पदावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती.
संदर्भ :- दि. ०४/१०/२०२३ रोजी संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली अंतिम निवड यादी.

संदर्भाधीन पत्रान्वये कळविल्यानुसार आपली मुंबई पोलीस शिपाई भरती-२०२१ प्रक्रियेंतर्गत मुंबई पोलीस दलात पोलीस शिपाई पदावर तात्पुरती निवड झालेली असून, आपली खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून दि. 28/12/2024 पासून पोलीस शिपाई पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्यात येत आहे.

१. अंतिम गुणवत्ता यादीनुसार आपली **अ.जा. (महिला)** या प्रवर्गातून पोलीस शिपाई पदावर नियुक्ती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात करण्यात आली आहे.

२. आपण नियुक्तीवर हजर झाल्याच्या दिनांकापासून आपले वेतन एस-७ या वेतन श्रेणी मधील रु. २१७००-६९१०० देय राहील.

३. अंतिम गुणवत्ता यादीनुसार आपली निवड गुणवत्तेनुसार जरी **अ.जा. (महिला)** प्रवर्गातून झाली असली तरी आपण सादर केलेल्या आवेदन अर्जामध्ये **अ.जा. (सर्वसाधारण)** प्रवर्गाचा दावा केलेला असल्यामुळे उक्त मागासवर्गीय आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार जातीचा दावा दाखल करणे, जात वैधता प्रमाणपत्राबाबतची पूर्तता करणे आपणास अनिवार्य व बंधनकारक आहे, अन्यथा भविष्यात आपणास आवेदन अर्जामध्ये मागासवर्गीयाचा दावा दाखल केला असल्यास त्याबाबतचा कोणताही लाभ देय होणार नाही.

४. अ) मागासवर्ग प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारास महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि. शा.नि.क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि. १२/१२/२०११ नुसार त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर उमेदवाराने, नियुक्ती आदेश स्विकारलेल्या दिनांकापासून ०६ महिन्याच्या आत त्यांच्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करून घ्यावी. अशा उमेदवाराने नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठीचा प्रस्ताव संबंधीत जात पडताळणी समितीकडे सादर करून जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची साक्षांकित प्रत न चुकता तात्काळ निम्न स्वाक्षरीकारास (कक्ष-१, कनिष्ठ आस्थापना) सादर करणे बंधनकारक राहील.

४. ब) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतुदींबाबत शासन परिपत्रक क्र. बीसीसी-२०१२/प्र.क्र.३३२/१२/१६-ब, दि. १८/०५/२०१३ नुसार मागासवर्गीय प्रवर्गातील कर्मचाऱ्यांबाबत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी व जात प्रमाणपत्र अवैध ठरल्यास कारवाईबाबत निर्देश नमूद केले आहेत. (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० हा कायदा दि. १८/१०/२००१ पासून अंमलात आला आहे. यातील

IQAC COORDINATOR
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya

INCHARGE PRINCIPAL
NSPM's L... Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nashik Road-422 101

कलम ६ मधील शासकीय सेवेत कार्यरत असलेली प्रत्येक व्यक्तीसाठी कर्मचाऱ्याने आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता, संबंधित जात पडताळणी समितीकडून पडताळणी करून घेणे आवश्यक आहे. यातील कलम १० मधील तरतुदीनुसार, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास वर्ग, या प्रवर्गातील व्यक्ती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीने खोटे प्रमाणपत्र सादर करून, मागास प्रवर्गासाठी राखीव असलेल्या पदावर नियुक्ती मिळविल्याचे आढळून आल्यास ती व्यक्ती सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्र. बीसीसी-२०१३/प्र.क्र. २८१/१३/१६-ब, मंत्रालय, मुंबई. दि. १२/१०/२०१३ मधील तरतुदीनुसार शासकीय सेवेतून काढून टाकण्यास पात्र ठरेल. तसेच अशा व्यक्तीने अन्य कोणतेही लाभ काढून घेतले असल्यास वसूल पात्र ठरेल.

४ (ब) याचिका क्र. २७९७/२०१५ व अन्य याचिकेवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. ०५/०८/२०१७ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे शासनामार्फत दाखल करण्यात आले आहे. न्यायालयीन मा. सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शनाच्या अधीन राहून नियुक्ती आदेश राहतील.

५. नियुक्तीनंतर आपणास एकूण ०९ महिन्यांच्या मूलभूत प्रशिक्षण पोलीस मुख्यालय/ पोलीस प्रशिक्षण विद्यालय येथे घ्यावे लागेल. मूलभूत प्रशिक्षण सक्तीचे असल्याने त्यात कोणत्याही कारणामुळे सूट / सवलत मिळणार नाही. याबाबत अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वेळोवेळी काढलेले आदेश बंधनकारक राहतील.

६. सदरचे प्रशिक्षण आपणास समाधानकारकरित्या पूर्ण करावे लागेल. तसेच त्यासाठी विहित केलेल्या परीक्षेमध्ये आपणास एकूण ४ संधीत उत्तीर्ण व्हावे लागेल. सदरचे प्रशिक्षण आपण समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास अथवा परिक्षेमध्ये विहित संधीत उत्तीर्ण न झाल्यास आपली सेवा समाप्त करण्यात येईल. या कालावधीमध्ये आपणास देय वार्षिक वेतनवाढी अनुज्ञेय राहणार नाहीत.

७. प्रशिक्षण कालावधीत आपणास कोणत्याही प्रकारची सुट्टी मिळणार नाही. प्रशिक्षण कालावधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय आपण गैरहजर राहिल्यास अथवा वरिष्ठ अधिकाऱ्यांशी / सहकाऱ्यांशी गैरवर्तन केल्यास अथवा रजा मिळण्यासाठी कोणत्याही प्रकारचे खोटे दाखले/ प्रमाणपत्र सादर केल्याचे निदर्शनास आल्यास, आपली सेवा कोणतेही कारण न देता केव्हाही सेवामुक्त करण्यात येईल.

८. महिला उमेदवारांबाबत प्रसुती रजे संदर्भात महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शा.नि.क्र.प्रसूर-२०१५/प्र.क्र.२४/सेवा-६, दि. १५/०१/२०१६ मधील तरतुदी व शासनाने वेळोवेळी दिलेले आदेश व रजा नियम लागू राहतील.

९. पोलीस दलातील नोकरीबाबतची पात्रता व क्षमता अजमावण्याकरिता पोलीस प्रशिक्षण विद्यालयात आपली मानसिक चाचणी घेण्यात येईल. या मानसिक चाचणीत आपण अपात्र ठरल्यास आपणास सेवामुक्त करण्यात येईल.

१०. पोलीस शिपाई पदावर आपली नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने कोणतेही कारण न देता मुंबई पोलीस नियमावली १९५९, भाग-१ मधील नियम क्र. ७८ (१)(ब) ते (viii) अन्वये आपली सेवा केव्हाही समाप्त करण्याची तरतूद आहे अथवा मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ मधील तरतुदीनुसार सेवा समाप्त करण्यात येईल.

११. प्रशिक्षण कालावधीत/अस्थायी सेवेत आपणामध्ये शारीरिक अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा दोष आढळल्यास किंवा प्रशिक्षण पूर्ण करण्यास हेतु-पुरस्सर टाळाटाळ केल्यास किंवा प्रशिक्षणास स्वारस्य न दाखविल्यास अथवा गैरहजर राहिल्यास/भगोडा झाल्यास किंवा कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन तसेच अशोभनीय कृत्य केल्यास आपली सेवा पोलीस नियमावली भाग-१ मधील नियम क्र. ७८(१)(viii) खालील टीप अन्वये कोणतेही कारण न देता आपणांस सेवामुक्त करण्याची तरतूद आहे. अथवा मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ मधील तरतुदीनुसार सेवा समाप्त करण्यात येईल.

१२. प्रशिक्षण कालावधीत आपणास कोणत्याही प्रकारची दुखापत, इजा झाल्यास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई देय राहणार नाही.

१३. महाराष्ट्र शासन, गृह विभाग, पत्र क्र. पोलसी-३११/प्र.क्र.५२१/पोल-५अ, दि. २६/०९/२०११ व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडील पत्र क्र. प्रशि/पोशि-भरती/ प्रशि खर्च वसुली/२०१२/२२३६, दि. २६/०४/२०१२ अन्वये नियुक्ती दिलेल्या नव प्रविष्ठ पोलीस शिपायाने प्रशिक्षण कालावधीत अथवा त्याचे प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील ३ वर्षात पोलीस शिपाई पदावरील नोकरीचा राजीनामा दिल्यास अथवा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यास विनंती केल्यास, आपल्या प्रशिक्षणावर झालेला सर्व खर्च प्रतिमाह रु. २,०००/- प्रमाणे वसूल करण्यात येईल. तसेच प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्त्याची रक्कम भरणे बंधनकारक राहील.

IQAC COORDINATOR
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya

INCHARGE PRINCIPAL
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nashik Road-422 101

१४. आपणांस आपल्या पदाचा राजीनामा द्यावयाचा झाल्यास आपणांस नियुक्ती प्राधिकाऱ्यास ०१ महिन्याची आगाऊ नोटीस द्यावी लागेल. अथवा १ महिन्याच्या नोटीसीच्या बदल्यात १ महिन्याच्या पगाराएवढी रक्कम नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे जमा करावी लागेल. तसेच आपल्याविरुद्ध कोणतीही चौकशी प्रलंबित अथवा प्रस्तावित असल्यास किंवा शासकीय येणी बाकी असता करता येणार नाही. पोलीस शिपाई पदाचा राजीनामा मंजूर झाल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत पुनर्नियुक्तीचा विचार केला जाणार नाही.

१५. आपणास महाराष्ट्र नागरी सेवा नियम, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१, मुंबई पोलीस नियमपुस्तिका १९५९, मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम १९५६ तसेच महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील तरतुदी तसेच शासन आणि पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वेळोवेळी निर्गमित केलेले नियम, आदेश लागू होतील.

१६. आपणास वेतन व भत्ते, सेवेच्या सर्वसाधारण शर्ती, रजा, सेवानिवृत्ती इत्यादी प्रयोजनार्थ महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू राहतील. तसेच शासन वेळोवेळी नियम अंमलात आणील त्यातील तरतुदी लागू राहतील. तसेच संगणकाची अर्हता प्राप्त करणे अनिवार्य राहील.

१७. पोलीस भरतीच्या वेळी आपण सादर केलेली शिक्षण, वय, धर्म, जात, अधिवास, नॉन क्रिमिलेअर, किंवा प्रकल्पग्रस्त/ धरणग्रस्त/ भूकंपग्रस्त, गृहरक्षक, माजी सैनिक, अंशकालीन पदवीधर/ पदवीधारक, अनाथ, पोलीस पाल्य, खेळाडू प्रमाणपत्र इ. बाबतची संबंधित प्रमाणपत्रे पोलीस पडताळणीमध्ये किंवा सेवा कालावधीत केव्हाही खोटी असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा सक्षम प्राधिकरणाकडील तपासणी अंती अवैध ठरविल्यास किंवा आपले पूर्वचारित्र्य व वर्तणूक चांगली नसल्याचे आढळून आल्यास किंवा साक्षांकन नमुन्यात दिलेली माहिती खोटी असल्याचे सिद्ध झाल्यास आपली सेवा समाप्त करण्यात येईल. त्याचप्रमाणे **सदर कसुरीबाबत आपल्याविरुद्ध भा.दं.वि. आणि इतर कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येईल.**

१८. आपण वैद्यकीय तपासणी दरम्यान आपला वैद्यकीय पूर्व इतिहास जाणीवपूर्वक लपविला असल्याचे सिद्ध झाल्यास शासनाचे कोणत्याही प्रकारचे लाभ देय ठरणार नाहीत. तसेच आपण सेवेस असमर्थ असल्याचे गृहीत धरून आपली सेवा समाप्तीबाबतची कोणतीही कारणमिमांसा विचारात घेतली जाणार नाही.

१९. पोलीस शिपाई पदावर तात्पुरत्या व अस्थायी स्वरूपात नियुक्ती दिलेली असल्यामुळे भविष्यात कधीही चारित्र्य पडताळणी अहवाला संदर्भात प्रतिकूल पैर अहवाल प्राप्त झाल्यास, कोणतीही आक्षेपार्ह बाब निदर्शनास आल्यास, आपलीसेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल व त्याबाबत आपणांस कोणतीही तक्रार अथवा दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

२०. पोलीस शिपाई पदावर आपणांस नेमणूक दिल्यानंतर आपल्या सेवा कालावधीत कधीही आपण अन्य आस्थापनेवरील भरतीकरिता पोलीस भरती होण्यासाठी गैरमार्गाचा, अवैध बाबींचा अवलंब केल्याचे निदर्शनास आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल. व आपणास त्याबाबत कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

२१. महाराष्ट्र शासन राजपत्र भाग-४ गुरुवार ते बुधवार, दि. ३०, २०२१-जानेवारी ५, २०२२/पौष ९-१५, शके १९४३ वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, दि. ३०/१२/२०२१ अन्वये आपण भरती प्रक्रियेमध्ये सादर केलेली कागदपत्रे, त्यानुषंगाने सेवापुस्तकात केलेली जन्मतारखेची नोंद अचूक असल्याबाबतचे आपण दिलेले हमीपत्रानुसार जन्मतारीख दुरुस्तीबाबतचा कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही.

२२. शासन निर्णय क्र. अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि. ३१/१०/०५ अन्वये दि. ०१/११/२००५ पासून "परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू झाली असल्याने आपणांस सदर योजनेच्या तरतुदी लागू होतील. त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती योजना (महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४) आणि सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी या योजनेतील तरतुदी आपणांस लागू होणार नाहीत.

२३. शासन परिपत्रक क्रमांक: एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दि. ०१/०३/२००५ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील नियम ४ नमुना अ नुसार सादर केलेल्या मुलांची संख्या ०२ पेक्षा अधिक असेल तर दि. २८/०३/२००५ व त्यानंतर जन्माला आलेल्या मुलामुळे नियुक्तीस अपात्र ठरत असल्याची नोंद घ्यावी.

IQAC COORDINATOR
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya

INCHARGE PRINCIPAL
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nashik Road-422 101

२४. पोलीस शिपाई पदावर रुजू झाल्याच्या तारखेपासून तीन महिन्याचे आत उपसचिव, महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि., शा.नि.क्र. सीडीआर-१०८८/२०८९/२२१/११, दि. २०/११/१९८० व वेळोवेळीच्या शासन आदेशानुसार विहित केलेले मत्ता व दायित्व (Assets & Liabilities) यासंबंधीचे विवरणपत्र स्वतः हून भरून आपण नेमणुकीस असलेल्या संबंधित कार्यालयात सादर करणे बंधनकारक आहे.

२५. शासनाने विहित केलेल्या नियमानुसार, आपण मराठी व हिंदी भाषा उत्तीर्ण केली नसल्यास किंवा आपणास सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळालेली नसल्यास आपणास सदर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

२६. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम २०१६ नुसार महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ या मूळ नियम-१२ नंतर नियम १३ अंतर्भूत करण्यात आलेला असून, त्यानुसार पोलीस शिपाई पदावर नियुक्त व्यक्तीने शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे, संगणक हाताळणी बाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे. शासन निर्णय सा.प्र.वि.क्र. प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि. १९/०३/२००३ नुसार आपणास नियुक्ती मिळाल्यापासून ०२ वर्षाच्या आत खालील पैकी संगणक अर्हतेचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

अ) D.O.E.A.C.C. संस्थेच्या अधिकृत "C.C.C." किंवा "O" स्तर किंवा "A" स्तर किंवा "B" स्तर किंवा "C" स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र किंवा

ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्याकडील अधिकृत "MS-CIT" परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र

२७. नवनियुक्त पोलीस शिपाई पदावर नियुक्ती मिळाल्यानंतर आपणांस पुढील उच्चशिक्षण अथवा इतर विभागात नियुक्तीसाठी परीक्षा द्यावयाची असल्यास त्या परीक्षेस बसण्यासाठी अर्ज सादर करण्यापूर्वी त्यांनी या कार्यालयाच्या सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

२८. नियुक्ती बाबत वरील सर्व अटी व शर्ती आणि आपण सादर केलेली संबंधित कागदपत्रे आपणांस मान्य व बंधनकारक असून सदर नियुक्ती स्विकारणे मान्य असल्यास कृपया सदर नियुक्ती आदेशाच्या कार्यालयीन प्रतीवर स्वाक्षरी करून त्याची एक प्रत नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे परत देण्यात यावी.

२९. महाराष्ट्र पोलीस (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील तसेच वेळोवेळी शासनाने केलेल्या सुधारीत नियमातील तरतुदीनुसार आपली बृहन्मुंबई पोलीस दलाव्यतिरिक्त इतर पोलीस घटकात बदलीसाठी कोणत्याही बदली केली जाणार नाही व त्याबाबत आपला कोणताही हक्क राहणार नाही.

३०. शासनाने शासकीय सेवेच्या प्रत्येक पदाचे सेवा प्रवेश नियम, कर्तव्य व जबाबदाऱ्या, प्रशिक्षण व पदोन्नती शर्ती याबाबतचे नियम भिन्न बनविले आहेत. एका पदाचे सेवा प्रवेश नियम दुसऱ्या पदास लागू होत नाहीत. त्यामुळे शासनाने सदर संदर्भ वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार संवर्गबाह्य बदली बाबतची विनंती विचारात घेतली जाणार नाही.

३१. पोलीस शिपाई पदावर तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात दिलेले नियुक्ती आदेश आपणास नॉन-क्रिमीलेअर (NCL) व आ.दु.घ. (EWS) प्रमाणपत्र पडताळणीच्या अधीन राहून देण्यात येत आहे. आपले नॉन-क्रिमीलेअर (NCL) व आ.दु.घ. (EWS) प्रमाणपत्र अवैध/बनावट/खोटे/चुकीचे आढळल्यास आपली पोलीस शिपाई पदावरील झालेली नियुक्ती रद्द करण्यात येईल व त्याबाबत आपणांस कोणतीही तक्रार अथवा दावा करण्याचा हक्क राहणार नाही. तसेच आपणास देण्यात आलेले वेतन व प्रशिक्षणासाठी झालेला खर्च नियमाप्रमाणे वसूल करुन शासन खाती जमा करण्यात येईल.

(शाम घुगे)
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय-२)
पोलीस आयुक्त कार्यालय, बृहन्मुंबई

नियुक्ती आदेशातील सर्व अटी व शर्ती मी वाचल्या असून पूर्णपणे समजून घेतल्या आहेत. व त्या मला मान्य व बंधनकारक असून, असे मी स्वखुशीने लिहून देत आहे. तसेच नियुक्ती आदेशाची प्रत मला प्राप्त झालेली आहे.

संपूर्ण नाव :- प्रतिक्षा अशोक आव्हाड ............ सही :- Pratiksha

**IQAC COORDINATOR**
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nashik Road-422 101

**INCHARGE PRINCIPAL**
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nashik Road-422 101

1630

महाराष्ट्र पोलीस
नवी मुंबई

क्र.पोआ/नमुं/आस्था-६/पो.शि.भरती-२०२१/नियुक्ती आदेश/ /२०२३
पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांचे कार्यालय,सी.बी.डी.बेलापूर,
सेक्टर नंबर-१०,रिझर्व्ह बँकेसमोर, नवी मुंबई -४०० ६१४,
☎ ०२२-२७५६११२१ ०२२-२७५७४११९,
establishmenthr-nm@mahapolice.gov.in दिनांक :- 25/०५/२०२३

संदर्भ :- १. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११, दि.१६.०६.२०११
२. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)(सुधारणा) नियम, २०१६, दि.०७.०१.२०१६
३. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश)(सुधारणा) नियम, २०१६, दि.२२.०२.२०१६
४. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (पहिली सुधारणा) नियम,२०२२, दि.२३.०६.२०२२
५. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (दुसरी सुधारणा) नियम,२०२२, दि.२०.१०.२०२२
६. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (तिसरी सुधारणा) नियम,२०२२, दि.०३.११.२०२२

विषय :- पोलीस शिपाई भरती - सन २०२१
पोलीस शिपाई पदावर अस्थायी व तात्पुरत्या स्वरुपात नेमणुकीबाबत

****

## आदेश

नवी मुंबई पोलीस घटकांत सन -२०२१ मध्ये रिक्त असलेल्या " **पोलीस शिपाई** " पदाकरिता पोलीस भरती प्रक्रिया आयोजित करण्यात आली होती. सदर पोलीस भरती दरम्यान लेखी परीक्षा व मैदानी चाचणी मध्ये गुणानुक्रम, सामाजिक व समांतर आरक्षणानुसार खालील नमुद पुरुष व महिला उमेदवार हे पोलीस शिपाई पदाच्या अंतिम निवड सुचित पात्र ठरलेले आहेत. तसेच सदरचे उमेदवार वैद्यकिय तपासणी व चारित्र्य पडताळणी मध्ये पोलीस शिपाई पदावर नियुक्तीसाठी पात्र ठरले आहेत.

महाराष्ट्र पोलीस नियमावली १९९९, भाग-१ मधील नियम क्र.६३ मध्ये दिलेल्या अधिकारानुसार खालील नमूद पात्र उमेदवारांना नवी मुंबई पोलीस घटकाचे आस्थापनेवर " पोलीस शिपाई (गट-क)" या संवर्गात सुधारित वेतन मॅट्रिक्स मधील वेतन स्तर एस-७ रुपये २१७००-६९१०० व विशेष वेतन रु.७५०/- (अधिक नियमानुसार वेतन व भत्ते) या वेतनावर पोलीस मुख्यालय, नवी मुंबई येथे प्रत्यक्ष हजर झालेल्या दिनांका पासून खालील नमुद केलेल्या अटी व शर्तीचे अधीन राहून **अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती** करण्यात येत आहे.

IQAC COORDINATOR
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nashik Road-422 101

INCHARGE PRINCIPAL
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nashik Road-422 101

| अ.क्र | चेस्ट नं. | उमेदवाराचे नाव | लिग | मुळ प्रवर्ग | निवड प्रवर्ग | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|
| ५१ | २३५० | रणजित रावसाहेब पाटील | पुरुष | EWS | EWS | None |
| ५२ | ४४६२ | अंकुश ब्रम्हदेव हरबक | पुरुष | EWS | OPEN | None |
| ५३ | ६२२६ | आशिष आनंद भोसले | पुरुष | OPEN | OPEN | None |
| ५४ | ३१६९ | कृष्णा अंबादास भागडे | पुरुष | OBC | OBC | None |
| ५५ | ४८३२ | अजय रविंद्र बोबडे | पुरुष | EWS | EWS | None |
| ५६ | ६५११ | विजय शिवाजी पाटील | पुरुष | EWS | EWS | None |
| ५७ | २६११ | मयुर विठ्ठल वाघ | पुरुष | OBC | OBC | None |
| ५८ | ३७२६ | आकाश सतिश राजपुत | पुरुष | VJ-A | VJ-A | None |
| ५९ | ८५७४ | प्रिती रमेश गाढवे | महिला | EWS | OPEN | Female |
| ६० | ६३५२ | निलेश किशोर चव्हाण | पुरुष | EWS | EWS | None |
| ६१ | ८५०० | रेणुका रामशंकर शुक्ला | महिला | OPEN | OPEN | Female |
| ६२ | ३९५३ | सोनु मोहन गांगडे | पुरुष | OBC | OBC | None |
| ६३ | २७५९ | प्रमोद बाळासाहेब गायखे | पुरुष | OBC | OBC | None |
| ६४ | ८५१० | अपेक्षा ज्ञानेश्वर पवार | महिला | OBC | OPEN | Female |
| ६५ | ३६१४ | अजय मारुती मारकड | पुरुष | OPEN | OPEN | PAP |
| ६६ | ४६७२ | शुभम अनिल पवार | पुरुष | EWS | OPEN | Homeguard |
| ६७ | ८५११ | शुभांगी भागवत दराडे | महिला | OPEN | OPEN | Female |
| ६८ | ८६१० | गौरी अविष्कार जगताप | महिला | EWS | OPEN | Female |
| ६९ | ८६६९ | ऐश्वर्या विरपक्ष स्वामी | महिला | OPEN | OPEN | Female |
| ७० | ८६२४ | श्वेता मारुती पाटील | महिला | EWS | OPEN | Female |

INCHARGE PRINCIPAL
NSPM's ... Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nashik Road-422 101

IQAC COORDINATOR
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya

२३. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम २०१६ नुसार महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ या मुख्य नियमामधील नियम ३(१)(क) नंतर उपखंड (ड) समाविष्ट करण्यात आलेला असून, त्यानुसार आवश्यक अर्हता म्हणून पोलीस भरतीमध्ये पोलीस शिपाई पदाकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवाराने मोटार वाहन अधिनियम, १९८८ मधील कलम २(२१) नुसार हलकी वाहने चालविण्याचा (L.M.V.) परवाना धारण करणे बंधनकारक राहील. परंतु सदर परवाना धारण न करणाऱ्या उमेदवाराने नियुक्तीनंतर त्यांचे पोलीस प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर दोन वर्षांच्या आत परवाना धारण करण्यात यावा. जर या कालावधीत हलकी वाहने चालविण्याचा परवाना धारण न केल्यास, पोलीस शिपाई पदासाठीची निवड रद्द ठरवून सेवा समाप्त करण्यात येईल.

२४. पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) (सुधारणा) नियम २०१६ नुसार महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ या मुख्य नियमातील नियम-१२ नंतर नियम-१३ अंतर्भूत करण्यात आलेला असून, त्यानुसार पोलीस शिपाई पदावर नियुक्त व्यक्तीने शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाकडून वेळोवेळी विहित करण्यात येणारे, संगणक हाताळणी बाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक आहे.

२५. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण-२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९.०३.२००३ मधील तरतुदीनुसार नियुक्तीच्या दिनांकापासून ०२ वर्षांच्या आत संगणक हाताळणी/वापराबाबतचे शासन मान्य विहित प्रमाणपत्र सादर करावे. सदर विहित मुदतीत प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या उमेदवारांची विहित प्रमाणपत्र सादर करेपर्यंत त्यांची वेतनवाढ रोखण्यास पात्र राहील.

२६. आपणास महाराष्ट्र शासन नियमानुसार हिंदी व मराठी परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर हिंदी व मराठी भाषा परीक्षा त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार उत्तीर्ण व्हाव्या लागतील.

२७. महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम-२०११ मधील नियम १३ नुसार नियुक्ती दिलेल्या पोलीस शिपायांना महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१, महाराष्ट्र पोलीस नियमावली, १९९९, महाराष्ट्र पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम-२०११ तसेच महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसूचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील विहीत केलेले अन्य नियम व तरतुदी बंधनकारक राहतील.

२८. उमेदवारास कर्तव्यावर रुजू होतेवेळी भारतीय राज्य घटनेतील संघराज्याशी एकनिष्ठ राहण्याबाबत लेखी शपथ घेणे बंधनकारक आहे.

२९. त्याचप्रमाणे पोलीस शिपाई पदावर नियुक्ती दिल्यानंतर आपणास पुढील उच्च शिक्षण अथवा इतर विभागात नियुक्तीसाठी परीक्षा देण्याची असल्यास सदर विभाग प्रमुखामार्फत अर्ज करण्यापूर्वी त्यांनी या कार्यालयाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील.

३०. पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई यांचेकडील क्र.पोमसं/६/१०/पो.शि.भरती/सेवाज्येष्ठता/२५१/२०१२, दिनांक १७/०८/२०१३ अन्वये स्थायी आदेश क्र.२२/२०१३ मधील तरतुदीनुसार सेवाज्येष्ठता निश्चित करण्यात येईल.

३१. सुधारीत पोलीस शिपाई भरती सेवाप्रवेश नियम-२०११ व महाराष्ट्र शासन गृह विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण १०१७/प्र.क्र.४१९/पोल-५ब, दि.२६/१०/२०१७ मधील तरतुदीनुसार घटक बदली नियमावली लागू राहील.

३२. आपण समांतर आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी सादर केलेले समांतर आरक्षणाबाबतचे प्रमाणपत्र भविष्यात खोटे असल्याचे आढळून आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

३३. महाराष्ट्र शासन, सा.प्र.वि. शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.२०७/कार्या.१२ दि.२६.०९.२०१८ व महाराष्ट्र नागरी सेवा (...) नियमावली, २०२१ मधील तरतुदीनुसार नियुक्ती आदेश निर्गमित झाल्या दिनांकापासून ... संबंधित उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी ...

IQAC COORDINATOR
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya

INCHARGE
NSPM's L...
Arts, Com. ...

आवश्यक आहे. सदर कालावधीत नियुक्ती झालेला उमेदवार हजर न झाल्यास, असा उमेदवार नोकरीची संधी गमावेल व त्याचे नियुक्ती आदेश रद्द करण्यात येतील. यासाठी उमेदवारांकडून देण्यात येणाऱ्या कारणांचा/विनंतीचा विचार केला जाणार नाही. या नियुक्ती आदेशातील उमेदवारांनी याबाबतची नोंद घ्यावी.

पोलीस आयुक्त
नवी मुंबई

(संजयकुमार पाटील)
पोलीस उपआयुक्त, मुख्यालय
नवी मुंबई

प्रति,

सर्व संबंधित उमेदवार

INCHARGE PRINCIPAL
NSPM's ... Ramrao ...mukh
Arts, Com. & Sci. Mahila Maha...alaya
Jail Road, Nashik Road-422 101

IQAC COORDINATOR
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Maha... ...ya
Jail Road, Nashik Road-42...

महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,

**प्रादेशिक कार्यालय, रामकृष्ण परमहंस मार्ग, टपाल पेटी क्र.४५६, नाशिक-२.**
दुरध्वनी क्र. ०२५३- २५७७२२० (वै)/(फॅक्स), २५७१४१०/२५७१८८७/२३१६६५७/२३१७०३६ (का.)
Web (www.dvet-ronashik.in)     Email- est.ronsk@dvet. gov.in

---

जा.क्र.प्राकाना/आस्था/अ-१/२०२१/१२७९     दिनांक : २३/०२/२०२१

(अनुकंपा नियुक्ती)
**रजिस्टर पोष्टाने रवाना :**

प्रति,
कु. तेजस्वीनी जगन्नाथ संधान
रा. शिवम अपार्टमेंट, प्लॅट नं. २, मॉडेल कॉलनी,
तुलसी पार्क समोर, जेलरोड, नाशिकरोड
नाशिक ४२२ १०१

**संदर्भ** :- १) सामान्य प्रशासन विभाग, शा.नि. क्र. १०९३/२३३५/प्र.क्र.९०/९३/आठ, दि.२६ ऑक्टो. १९९४.
२) सामान्य प्रशासन विभाग, शा.नि.क्र. अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४/आठ,दि.२२ ऑगस्ट २००५.
३) सामान्य प्रशासन विभाग, शा.नि. क्र. अकंपा-१००७/१२९५/प्र.क्र.१८१/०७/आठ, दि. २३-४-२००८.
४) सामान्य प्रशासन विभाग, शा.नि. क्र. अकंपा-१०१४/प्र.क्र.३४/आठ, दि. ०१-०३-२०१४.
५) सामान्य प्रशासन विभाग, शा.नि. क्र. अकंपा-१०१४/प्र.क्र.१६४/आठ, दि. २०-०५-२०१५.

शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पात्र नातेवाईकास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत शासनाने संदर्भित आदेशान्वये वेळोवेळी विहित केलेल्या तरतुदी विचारात घेवून या कार्यालयाच्या स्तरावर ठेवलेल्या प्रतिक्षासूचीतील जेष्ठतेनुसार आपली **गट-ड** संवर्गातील **चतुर्थश्रेणी कर्मचारी** या पदावर **औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नाशिक (मुलींची). जि. नाशिक** येथे खालील अटी व शर्तीवर नेमणूक करण्यात येत आहे.

१) आपली नेमणूक ही **इ.मा.व.** या प्रवर्गामध्ये करण्यात येत आहे.
२) आपली नेमणूक ही (एस-१) रुपये १५०००-४७६०० या वेतनश्रेणीत अधिक शासनाने वेळोवेळी मंजूर केलेले भत्ते यावर राहील.
३) आपणास सेवा सोडावयाची असेल तर एक महिन्याची नोटीस अथवा त्याऐवजी एक महिन्याच्या मुळ वेतना इतकी रक्कम भरावी लागेल.
४) सध्या अस्तित्वात असलेले नियम जे शासकीय सेवेत प्रवेश करतांना लागू असतात त्यामध्ये नंतर वेळोवेळी होणाऱ्या संबंधित नियमाच्या दुरुस्त्या त्यांना बंधनकारक असतील.
५) या आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत संबंधित संस्थेत हजर न झाल्यास त्यांना सेवेची गरज नाही असे गृहित धरुन सदर आदेश रद्द करण्यात येतील व त्या नंतर कोणतीही सबब ऐकुन घेतली जाणार नाही.
६) आपणास संबंधित जिल्हयातील जिल्हा शल्य चिकित्सकांचे शारिरीक स्वास्थ्य प्रमाणपत्र दोन महिन्याच्या आत सादर करावे लागेल, व जर ते समाधानकारक नसेल तर त्यांची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.
७) पोलिस खात्याकडुन त्यांचे चारित्र्य आणि पूर्वचारित्र्य यांची पडताळणी बाबत कोणताही प्रतिकुल अहवाल प्राप्त झाल्यास त्यांची सेवा पुढे चालू ठेवली जाणार नाही व त्यांना सेवेतून त्वरित कमी केले जाईल.
८) सेवेत रुजू होण्याकरीता आपणास कोणत्याही प्रकारे प्रवासभत्ता किंवा इतर कुठलाही भत्ता देण्यात येणार नाही.
९) आवश्यकतेनुसार आपणास नियमानुसार हमीपत्र / वैयक्तिक जमानतनामा द्यावे लागेल.
१०) आपली नेमणूक ही अनुकंपा तत्वावरील उमेदवार म्हणून करण्यांत येत असून त्याअनुषंगाने, आपण या कार्यालयास सादर केलेल्या अभिलेख्यांमध्ये काही त्रुटी आढळून आल्यास आपली सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल.

IQAC Co-ordinator
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya

PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road-422101

अ) अट क्रमांक ११ अन्वये विहीत केलेली पोच पावती संबंधितांकडून घ्यावी व त्यांच्या सेवापुस्तकात इतर मुळ स्वग्राम, तसेच घटनेशी निष्ठा इ. प्रतिज्ञापत्रा सोबत चिकटवावी.

ब) संबंधित कर्मचाऱ्यांची वैद्यकीय तपासणी  दोन महिन्यांचे आत आयोजित करावी.

क) संबंधित उमेदवाराचे चारीत्र्य व पुर्वचारीत्र्य पडताळणी तात्काळ पुर्ण करण्यांत येवून व त्याबाबतच्या नोंदी सेवापुस्तकात घेण्यांत याव्यात व तसे या कार्यालयास अवगत करावे.

ड) संबंधित कर्मचाऱ्यांच्या कामाबाबतचा खास अहवाल नेमणूक कालावधी संपण्यापूर्वी या कार्यालयास सादर करावा. जेणेकरुन पुढील कार्यवाही करणे या कार्यालयास सोईस्कर होईल.

इ) संबंधित कर्मचाऱ्यास म.ना.से. (रजा) नियम १९८१ मधील नियम क्र.५४ २(ए) अन्वये प्रथम एका वर्षासाठी कोणत्याही प्रकारची दीर्घ रजा देय राहाणार नाही.

३) कोषागार अधिकारी, नाशिक, जि. नाशिक.

४) आस्थापना अ-३, अ-५, विभाग व गोपनीय विभाग, प्रादेशिक कार्यालय, नाशिक.

५) निवड नस्ती.

IQAC Co-ordinator
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road - 422 101

Leena Pandhare
PRINCIPAL
N.S.P.M's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts & Commerce Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nasik Road-422101

# छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था, पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागासप्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागासप्रवर्ग कल्याण या विभागाची स्वायत्त संस्था)

सारथी

कार्यालयाचा पत्ता, गोखले इन्स्टिट्यूट आवार, बी.एम.सी.सी. रोड, शिवाजीनगर, पुणे (महाराष्ट्र) - ४११००४

| Email ID : md.sarthi@maharashtra.gov.in | CIN- U74999PN2018NPL177394 | Website : www.sarthi-maharashtragov.in |
|---|---|---|

जा.क्र.सारथी/पुणे/तारादुत निवड/२०१९-२०/ ८३९१२६

दिनांक -२८/११/२०१९

## आदेश

प्रति,

**कोमल तानाजी चौधरी**
**तालुका इगतपुरी**
**जिल्हा नाशिक**

संदर्भ :- १) **तारादूत** या पथदर्शी प्रकल्पांतर्गत सारथीने नेमून दिलेल्या प्रादेशिक विभागांतर्गत **तारादूत** म्हणून तात्पुरती निवड संबंधात सारथीच्या वेबसाईटवर https://sarthi-maharashtragov.in/noticeboard यालिंकवर दिलेली निवड यादी व त्याचबरोबर **"तारादूत- पथदर्शीप्रकल्प"** हार्दिक अभिनंदन या सदराखाली सारथीने दिलेला तपशिल (वेबसाईटवर Uploaded)

२) **तारादूत** म्हणून आपली तात्पुरत्या निवडीबाबत सारथी या संस्थेकडून ६ ते १० सप्टेंबर २०१९ यादरम्यान पाठविण्यात आलेले SMS / संदेश / दूरध्वनी.

३) आपणास देण्यात आलेला आदेश जा क्र सारथी/ पुणे/तारादूत निवड/ २०१९-२०/५०६ दि. १३/९/२०१९

**संदर्भ ३ अन्वये दिलेला आदेश याद्वारे रद्द करण्यात येत असून सुधारित आदेश खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.**

उपरोक्त संदर्भान्वये सारथी कडून दिलेली माहिती, सुचना इ. प्रमाणे आपण **तारादूत** म्हणून पारिश्रमीक तत्वावर करार पध्दतीने काम करण्यापूर्वी नाशिक येथे आपण सारथीच्या खर्चाने निवासी प्रशिक्षण पूर्ण केले आहे. संदर्भ क्र. १ मधील समाविष्ट **तारादूत** सारथीच्या सर्व सुचना आपणास मान्य असल्याचे आपण लेखी हमी पत्र दिलेले आहे. तथापि आपणास सारथीच्या उपरोक्त सुचना, अटी व शर्ती इ. बाबत संक्षिप्त मध्ये पुन: खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

## अटी व शर्ती (संक्षिप्त मध्ये)

**IQAC COORDINATOR**
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Comm & Sci. Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nashik Road

१. छत्रपती शाहु महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे यांच्या ' तारादूत ' या पथदर्शी व प्रायोगिक तत्वावर चालू केलेल्या प्रकल्पाअंतर्गत **"तारादूत"** म्हणून पारिश्रमिक तत्वावर काम करण्यासाठी परीक्षा व मुलाखतीच्या आधारे आपली तात्पुरत्या स्वरूपात निवड करण्यात आली असून आपणास दिनांक ०१/१२/२०१९ पासून ११ महिन्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व

शर्तीवर परिश्रमिक तत्वावर करार पद्धतीने ठेवण्यात येत आहे.आपण रुजू होताना सारथींच्या अधिकृत प्रतिनिधी सोबत आपल्याला करार करावा लागणार व त्यातील सर्व अटी व शर्ती मान्य कराव्या लागणार.

२. सारथीद्वारे निश्चित केलेल्या विविध विषयावर आपल्या कार्यक्षेत्रात माहिती देणे, प्रबोधन करणे, जाणीव जागृती करणे तसेच संशोधनासाठी सर्वेक्षण करणे व माहिती संकलित करणे, तसेच सारथी द्वारे वेळोवेळी सूचित इतर कामे पूर्ण करण्याची आपणावर जबाबदारी असेल.

३. आपणास कोणतीही पूर्वसूचना न देता व कोणतेही कारण न देता कामावरून कमी करण्याचा किंवा संपूर्ण प्रकल्प कोणत्याही टप्प्यात बंद करण्याचा अधिकार व्यवस्थापकीय संचालक, सारथी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांनी राखून ठेवला आहे.

४. आपणास एकत्रित **रु.१८,०००/- (अक्षरी रुपये अठरा हजार फक्त)** प्रतिमाह ठोक पारिश्रमिक अनुज्ञेय राहील व त्यामधून नियमाप्रमाणे व्यवसाय कर व इतर कर कपात करण्यात येईल. **"तारादूत"** म्हणून काम करण्यासाठी आपल्या कार्यक्षेत्रात प्रवास करण्यासाठी व इतर खर्च उपरोक्त ठोक पारिश्रमिकामध्ये समाविष्ट आहे. आपणास स्वतंत्र प्रवास खर्च किंवा इतर कोणताही भत्ता इत्यादी अनुज्ञेय राहणार नाही. सारथी, पुणे यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी ठरवतील, त्याप्रमाणे आपणास प्रवास करणे बंधनकारक राहील.

५. आपल्याला तात्पुरत्या स्वरुपात करारतत्त्वावर ठेवण्यात येणार असल्यामुळे, तसेच त्या अनुषंगाने देण्यात येणा-या एकत्रित पारिश्रमिकामुळे आपणास नियमित / अनियमित किंवा हंगामी शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

६. तारादूत ही शासकीय नोकरी नसून केवळ पारिश्रमिक देवून प्रायोगिक तत्वावर सारथी संस्थेची काही ठराविक कामे करण्यासाठी आपणास केवळ तात्पुरत्या स्वरूपात करार तत्वावर कामावर ठेवले जात आहे. भविष्यात या संस्थेतील किंवा शासनाचे कोणत्याही इतर विभागातील कोणत्याही अस्थायी / स्थायी/ हंगामी पदावर किंवा मानधन / परिश्रमिक तत्वांवर किंवा इतर कोणत्याही प्रकारचे काम करण्यासाठी आपला कसल्याही प्रकारचा हक्क असणार नाही.

७. आपल्या कराराच्या काळात कामातून मुक्त व्हावयाचे असल्यास आपणास १५ दिवसाची लेखी पूर्व सूचना देणे बंधनकारक राहील.

८. **तारादूत** म्हणून काम करताना कोणताही तंटा / वाद उपस्थित झाल्यास त्याबाबत व्यवस्थापकीय संचालक, छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे किंवा त्यांनी

IQAC COORDINATOR
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nashik Road-422 101

INCHARGE PRINCIPAL
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nashik Road-422 101

प्राधिकृत केलेले या संस्थेमधील अधिकारी यांना निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार राहतील आणि त्यांचे निर्णय अंतिम व आपणास मान्य राहतील.

९. सारथी या संस्थेचे काम करीत असताना आपल्या हातुन/कडुन संस्थेच्या मालमत्तेचे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरित्या जे नुकसान होईल त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील व ती वसूलपात्र असेल.

१०. आपण **तारादूत** म्हणून काम करीत असताना कोणताही अपघात/ आजार, इत्यादी झाल्यास किंवा त्यामुळे काही इजा, मानसिक, शारीरिक, आर्थिक किंवा इतर कोणत्याही प्रकारचे नुकसान आपणास किंवा आपल्या कुटुंबियास झाल्यास त्याबाबत "सारथी" संस्थेची कोणतीही जबाबदारी राहणार नाही. आपल्यासाठी विमा काढण्याची जबाबदारी आपल्यावर राहील.

११. **तारादूत** म्हणून पूर्ण वेळ काम करणे (म्हणजेच इतर कोणत्याही प्रकारची नोकरी किंवा व्यवसाय न करता) बंधनकारक राहील. याबाबत कुणी गैरप्रकार केलेला आढळला तर आपल्याला देण्यात आलेले सर्व पारिश्रमिक वसूल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

१२. आपल्याला विभागाचे प्रकल्प अधिकारी/ सहाय्यक प्रकल्प संचालक/ प्रकल्प संचालक किंवा इतर प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या अधिनस्त त्यांच्या पर्यवेक्षण, सुचना, निर्देश, मार्गदर्शनानुसार आपणास काम करणे बंधनकारक राहिल.

१३. आपण कामांवर असताना आपले आचरण व कृती अत्युकृष्ट असणे अत्यंत महत्त्वाचे व गरजेचे आहे व लोकांशी सौजन्यपूर्ण वागणूक ठेवणे बंधनकारक राहील.

१४. आपण कोणत्याही प्रकारचा वैयक्तिक आकस, वंश, वर्ण, लिंग, कूळ, जन्मस्थान, कोणत्याही जाती-धर्मविरुध्द राग किंवा द्वेष, आक्रोश मनात न ठेवता सर्वांसाठी नि:पक्षपातीपणे व मैत्रीपूर्ण मनाने सारथी या संस्थेच्या "**तारादूत**" या पथदर्शी प्रकल्पामध्ये काम करणे बंधनकारक राहिल.तरी कोणत्याही व्यक्तींचे विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा, उपासना व धार्मिक भावनावर आघात पोहचेल असे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष भाष्य किंवा वर्तन करु नये. तसेच आढळून आल्यास आपल्याला लगेच कामावरून कमी करण्यात येईल.

१५. शासनाच्या कोणत्याही धोरण, योजना इत्यादींवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष टिका करणे/ दोष काढणे/ विरोध दर्शविणारी वक्तव्य करणे व तत्सम कृत्य करता येणार नाही.

१६. आपण कोणत्याही संघटना किंवा राजकीय पक्ष्यांचे सदस्य म्हणून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या काम करणार नाही किंवा कोणत्याही राजकीय पक्ष / व्यक्ती संघटनांच्या माध्यमातून सारथी संस्थेच्या कोणत्याही अधिकारी, कर्मचारी किंवा प्रतिनिधींवर दबाव आणणार नाही किंवा त्यांच्यामार्फत

**IQAC COORDINATOR**
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts Com. & Sci. Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nashik Road-422 101

**INCHARGE PRINCIPAL**
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts Com. & Sci. Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nashik Road-422 101

पत्रव्यवहार इत्यादी करणार नाही. तसे आढळून आल्यास आपल्याला लगेच कामावरून कमी करण्यात येईल व नुकसानभरपाई म्हणून त्या दिवसापर्यंतचा थकित पारिश्रमिक अनुज्ञेय राहणार नाही.

१७. आपल्याला लागू असलेली आचारसंहिता, कर्तव्ये व जबाबदाऱ्या तसेच अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक आहे. सोबत आचारसंहिता, कर्तव्य व जबाबदाऱ्यांचा तपशील संलग्न आहे.

१८. आपण कामावर हजर होताना आपल्याकडे अपघात विमा व आरोग्य विमा (Mediclaim Policy) असणे आवश्यक आहे. तसे नसल्यास, आपल्याला सदर दोन्ही विमा उतरविणे बंधनकारक असून आपणास तारादूत म्हणून हजर होताना किंवा हजर झाल्यानंतर उशिरात उशिर ०७ दिवसाच्या आत या दोन्ही विम्यांची पॉलिसी काढून त्याची प्रत "सारथी" च्या कार्यालयात जमा करावी लागेल.

१९. तारादूत म्हणून काम करण्यासाठी आपणास नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रामध्ये कोणताही बदल होणार नाही. तसेच, याबाबत कोणाचीही शिफारस अथवा कोणताही दबाव आणल्यास अशा बेशिस्त वर्तनाबद्दल आपणास कामावरुन कमी करण्यात येईल.

२०. वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत आपणास सारथी सोबत करारनामा करणे बंधनकारक राहील व त्यातील सर्व अटी व शर्ती आपल्याला मान्य कराव्या लागतील.

**मा. व्यवस्थापकीय संचालक,**
**यांच्या कडून मान्यता प्राप्त**

**निबंधक (अतिरिक्त कार्यभार)**
**छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व**
**मानव विकास संस्था (सारथी), पुणे**

प्रति,

**कोमल तानाजी चौधरी**
**तालुका इगतपुरी**
**जिल्हा नाशिक**

**IQAC COORDINATOR**
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nashik Road-422 101

प्रत: माहिती व पुढील योग्य कार्यवाहीसाठी

१. मा. व्यवस्थापकीय संचालक, सारथी यांचे स्वीय सहाय्यक
२. निबंधक, सारथी, पुणे.
३. लेखाअधिकारी, सारथी, पुणे.
४. मुख्य प्रकल्प संचालक, पथदर्शी प्रकल्प, सारथी, पुणे
५. सहा. लेखा अधिकारी, सारथी , पुणे
६. वैयक्तिक नस्ती / आदेश नस्ती.
७. संगणक कक्ष

**INCHARGE PRINCIPAL**
NSPM's Late Bindu Ramrao Deshmukh
Arts, Com. & Sci. Mahila Mahavidyalaya
Jail Road, Nashik Road-422 101